# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२१०१७२/२१/अ.क्र.३३९/२५

श्री.मंगेश बी. कदम
बिल्डींग नं.१ बी, ब्लॉक नं.११०
१ ला मजला, स्वदेशी मिल कंपाऊंड,
चुनाभट्टी (पू.), मुंबई-४०० ०२२.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-२
जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-२ यांचे कार्यालय
५ वा मजला, हॉकर्स प्लाझा इमारत, सेनापती बापट मार्ग,
दादर (प.), मुंबई-४०० ०१३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अधिकारी (चौकशी) प्र.
प्रमुख अधिकारी (चौकशी) यांचे कार्यालय, बृ.मुं.म.पा. मुख्यालय विस्तारीत इमारत,
४ था मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३१-१२-२०१९ | २४-०२-२०२० | १३-०२-२०२० | ०४-०३-२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.२४-०२-२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.०४-०३-२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.११-०१-२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.३१-१२-२०१९ अन्वये सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर विभाग कार्यालयात दि.०५-११-२०१९ व स्मरणपत्र-१ दि.०४-१२-२०१९ रोजीच्या तक्रार अर्जानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची दि.०५-११-२०१९ ते ३१-१२-२०१९ पर्यंतची माहिती मिळण्याबाबत मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तास दि.२४-०२-२०२० च्या पत्रान्वये माहिती अर्जातील मागणी केलेली माहिती आपणास परस्पर देण्यासाठी आपला अर्ज सहाय्यक आयुक्त, एफ/उत्तर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे असे कळविले.

जन माहिती अधिकारींनी माहिती निरीक्षण देवून चलन शुल्क बनवून न दिल्याने अपिलकर्तांनी दिनांक १३-०२-२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अधिकारी (चौकशी) प्र. यांनी दि.०४-०३-२०२० च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-२ यांनी दिलेले उत्तर सयुक्तिक आहे असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.११-०१-२०२१ रोजी जन माहिती अधिकारींकडून माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-२, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) मुख्यालय उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तांनी आयोगास सादर केले की, माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारींनी शुल्क भरण्यास सांगितले. चलन मिळाले नाही म्हणून प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारींनी चलन देण्याचे आदेश देवूनही चलन दिले नाही म्हणून द्वितीय अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-२ यांनी आयोगास सादर केले की, दि.०४-०१-२०२० च्या पत्रान्वये अपिलकर्तास माहिती दिली आहे. सदर पत्राची प्रत आयोगात सादर केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी अपिलकर्ताना माहिती दिली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 26-3-2025

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २६-०३-२०२५**

State Information Commission ★ Maharashtra ★